International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.3 Jan –Feb 2020

# भारतीय राजकारण आणि प्रसार माध्यम

डॉ. आकाश शेषराव बांगर
संशोधक विद्यार्थी
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

भारतीय लोकशाही ही जगाला हेवा वाटावा अशी ही भारताची लोकशाही आहे. राज्यशास्त्राच्या नियमा प्रमाणे लोकशाही म्हणजे "लोकांनी लोकांसाठी केलेले काम म्हणजे लोकशाही" हयात भारताच्या लोकशाहीची व्यापक व्याख्या आहे. लोकशाही जिवंत राहण्याचे मुख्य माध्यमात.

* भारतीय मतदार

* भारतातील राजकीय पक्ष आणि त्यांची विचारधारा

* संसद

* माध्यम

या बाबी प्रामुख्याने येतात.

हया बाबी प्रामुख्याने येत असला तरीही सध्याची भारताची वर्तमानस्थिती राजकारण आणि प्रसार माध्यमं हयातच किंवा हयांच्या भोवती फिरतांना दिसत आहे. मुळातच भारताची निवडणूक प्रणाली ही बहुपक्षीय असल्याने राजकारणी लोकांवर राजकीय पक्षांचा मोठा प्रभाव निर्माण झाला आहे. या पक्षांच्या बांधणीला आज सर्वसामान्य माणसांच्या पर्यंत जायला माध्यमं अतिशय महत्वची भूमिका निभवत असतात. आज भारताच्या राजकारणावर माध्यमांचा मोठा प्रभाव राहिला आहे. तो प्रभाव आज वाढलेला दिसत असला तरी, हया माध्यमांचा प्रभाव पूर्वापार राहिला आहे.

भारतीय राजकारणात धृवीकरणाची पद्धत आज खूप जास्त असली असं दिसत असले तरीही मुळापासून ह्याच विषयाचा प्रभाव भारतीय राजकारणावर राहिला आहे, तेव्हा हया विषयात देखील राजकीय आणि माध्यम जबाबदार आहेत तेंव्हा राजकारणावर व्यक्तीचा प्रभाव असणे हेच राजकीय पक्षांची मुख्य धारणा असते हया ला अनुसरूनच पक्षांच्या धोरणांची माहिती समाजापर्यंत यायला माध्यम महत्वाची भूमिका निभवत असतात.

**उद्देश**

१. भारतीय पक्ष & व्यक्तिमत्त्वाची भूमिका पाहणे.

२. भारतीय राजकारणामधील प्रसारमाध्यमांची भूमिका तपासणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

**राजकीय पक्ष आणि व्यक्तिमत्त्वाची भूमिका**

भारतीय स्वातंत्र्य संग्राम हा जगाच्या इतिहासाला सर्वात मोठा स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा होता. या लढ्याला भारतातला सर्वच सामान्य ते असामान्य व्यक्तीने अगदी सर्वोच्च बलिदान दिलेले आहे. यासह भारताला सर्वसमावेशक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा हयाच लढ्याची देणं आहे. काँग्रेस हया संस्थेचा अर्थ म्हणजे "एखाद्या विशिष्ट ध्येयासाठी एकत्र आलेल संघटन" तसच भारतीय काँग्रेसला भारतीय स्वातंत्र्य मिळवून देणे, नव्हे त्यासाठी कार्यकरणे हेच होते.

1885 ला हया राजकीय पक्षांची स्थापना झाली. स्वातंत्र्य हा सर्वसामान्यांचा आस्थेचा विषय असल्याने सामान्य ते सर्वच व्यक्ती आणि कार्यकर्ते या पक्षांची नाळ बांधून होते, हा पक्ष जसा स्थापन झाला तसा काही व्यक्तीत्वांचा प्रभाव हा हया पक्षावर राहिला. काँग्रेस या पक्षावर सर्वात पहिला आणि दीर्घकाळ प्रभाव राहिला तो लोकमान्य बाळगंगाधर टिळकांचा आणि टिळकांचा प्रभाव पक्ष स्थापने पासून ते त्यांच्या निधनापर्यंत राहिला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हया भारतीय पोषक लोकशाहीला त्यांच्या **"केसरी"** हया माध्यमांने मोठी योजना केली. केसरी हा टिळकांच्या विचाराने सामान्यांना टिळकांचा विचार म्हणजे काँग्रेसचा विचार वाटू लागला. लोकमान्यांनी इंग्रज आणि त्यांचे अधिकारी आणि त्यांचे जाचक कायदे वा अटी हया केसरीच्या माध्यमातून आपला पूर्वजांपर्यंत योग्य पोचत होता. राजकीय व्यक्ती व त्यांची प्रतिमा आणि त्यांच्या प्रतिमेला मिळणारी प्रतिभेची झळणी ही माध्यमांमुळेच असते हे आपण लक्षात घेतल पाहिजे.

अगदी भारतात तेंव्हा लोकशाही नव्हती तेंव्हा देखील हया राजकारणात पत्र माध्यम, किंवा संदेश वहक व्यक्ती हा तो राजकीय कामाच राजकारण करायला वा संदेश वाहकाच्या भूमिकेत तो असायचा. भारतीय राजकारण हे जसे सर्वात जुने आहे तसेच माध्यमांची भूमिकाही तितकीच जुनी आहे.

भारतात जेव्हा धर्माधिष्टीत राजकारण चालायचे तेव्हा संहिता, अरण्यके, उपनिषद, मनुस्मृति, सूत्र, शास्त्र, या माध्यमांच्या माध्यमातून ते चालायचे.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात राजकारण आणि त्या माध्यमांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. भारतीय राजकारणात माध्यमांची खऱ्या अर्थात खरी भूमिका ही 1980 च्या नंतर कमालीची बदल्याचा अनुभव आपल्याला इतिहासाचे दर्शन घेताना होता आहे.

राजकारण आणि राजकीय सत्ता या विषयांच्या बाबतीत माध्यमं नेहमीच परस्पर पूरक आहेत. मागे म्हणला प्रमाणे सर्वात प्रथम काँग्रेसला केसरीची साथ स्वातंत्र्य पूर्व काळात जशी होती, तशी "यंग इंडिया" हया मुखपत्राने देखील काँग्रेसला आणि त्याच्या राजकारणाला चांगले वळण दिले.

हा विषय केवळ एकाच राजकीय पक्षांचा होतो असं नाही. भारताला प्रत्येक राजकीय पक्षांने आपापले मुखपत्र त्या सुरुवातीच्या काळात जनसंघ, आताची भारतीय जनता पार्टीचे देखील स्वतःचे मुखपत्र सादर केले होते. भारतीय राजकारणात माध्यमांची मिंमासा करण्याची ही पार्श्वभूमी आपण लक्षात

घेतली आहे. भारतीय स्वातंत्र्याचा नंतर जी राजकारणाची भूमिका आणि माध्यमांची भूमिका आपण लक्षात घेऊयात.

राजकारणाला चांगला आणि वाईट स्थितीत पोहोचवण्याचं माध्यम हे प्रसार माध्यमंच आहेत. हया प्रसार माध्यमाची भूमीका आज मीतीला सर्वात महत्त्वाची आहे.

राजकारण आणि माध्यमं हयांचा संबंध जुनाच आहे हे आपण लक्षात घेतलं आहे. पूरक आता झाला आहे दोन्हीचे स्वरूप आता कमालीचे बदलले आहे. आता निवडणुका आल्या की माध्यमांना अचानक पेव फुटतो आणि सत्याचा मागोवा घेताना निवडणुकीमूळे रस्ता भरकटतो. हया माध्यमांच्या भरकटण्यामुळे हया देशात खोटे बोलणारे व समाजाचा मुख्यमुद्द्यापासून दूर सारणारे माणसं शिर्ष स्थानात पोचलेले दिसतात.

अर्थात राजकारण आणि माध्यमे यांच्या संबंध केवळ एखादी सत्य घटना उजेडात आणणे हा एवढाच नसतो तर त्या घटनेची माहिती सत्य आणि किती निकोप असायला हवी. एखाद्यावर राजकीय अन्याय होत असेल किंवा एखादा नेता व व्यक्ती राजकीय प्रक्रिया बळी ठरत असेल तर अशा वेळी हया प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, भूमिकेवरून व्यक्तीला वा त्या पक्षाला योग्य तो न्याय मिळवता येतो. खरं पाहता सत्य कधीही सत्यच असत.

**सच घटे या बढे,**
**सच सच नहीं रहता ||**

सत्य घटल किंवा वाढल तर खरं खरं राहत नाही. त्यामुळे कोणालाही विषयाची मांडणी ही तटस्थपणेच मांडली पाहिजे. राजकारणात तर हा विषय अतिशय पद्धतशीरपणे हाताळला पाहिजे पण सध्या तसे पाहायला मिळत नाही. माध्यम आपला बाजार बसवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात. त्या मुळे आपल्याला या विषयात राजकारण आणि संबंधीत विषयात अधिक सजग असावं....

घटना साधारणपणे आणीबाणीच्या काळातली आहे. जेव्हा पंतप्रधान पदावर असताना इंदिरा गांधी हयांनी सर्वात प्रथम वृत्तपत्रांवर बंदी घातली होती. ही बंदीच सांगून जाते राजकारण आणि वृत्तपत्राचे संबंध. इंदिरा गांधी ज्या पद्धतीने लोकशाहीचा गळा कापला आणि माध्यमांवर बंदी घातली तेंव्हाच माध्यमांची शैली खूप बदलली. तेव्हा संपूर्ण माध्यमे ही इंदिरा गांधीच्या विरोधात होते. इंदिरा गांधीं यांची ही सर्वात मोठी चूक होती आणि तरी देखील काही माध्यमे ही इंदिरा गांधीच समर्थन करण्यात मग्न होती. म्हणजे हयाचा अर्थ काय तर माध्यमांना सत्य माहिती होते तरी ही माध्यमं इंदिरा गांधीची भलावल करायचे. कहर तर तेव्हा झाला जेव्हा इंदिरा गांधी लोकसभेची निवडणूक ही राजनारायण त्यांच्या विरोधात पराभूत झाल्यावर देखील काही माध्यम हे इंदिरा गांधीची उघड बाजु घ्यायचे....

दुसरं उदाहरण हे साधारणपणे सत्तरच्या दशकात असावे. महाराष्ट्राचे विचारवंत श्री. नरहरराव अंबादासराव कुरुंदकर गुरुजी हयांनी एका पत्रकाराला विचारले की तू कोणत्या वृत्तपत्रात काम करतो तेव्हा त्या तरुणांनी ज्यावेळी तो ज्यात काम करायचा त्याचे नाव सांगितलं. तेव्हा कुरूंदकरांनी परत प्रश्न विचारला, कि हया देशात हिंदूचा सर्वात मोठा पक्ष कोणता तेव्हा त्याने परत उत्तर दिले. खरं पाहता त्या पत्रकाराला सुद्धा माहिती होते की त्याकाळात हिंदूची मते हिंदुत्वादी पक्षाला जेमतेम चार टक्के मते

मिळायची, हे सर्व लोकांना माहिती असताना त्यांनी त्यांचे सत्य सोडून त्या पत्रकाराने बाजू चुकीची आहे हे माहिती असतानाही तो कुरुंदकरांना पटवून द्यायला लागला. कुरुंदकरांनी त्या पत्रकाराला पत्रकारांचा धर्म सांगितला आणि मग त्या विषयाची जाणीव त्या संबंधित पत्रकाराला झाली आणि मग तो पत्रकार योग्य मार्गावर आला....

तो पत्रकार केवळ योग्य मार्गावर आला असे नाही तर आजपर्यंत तो माणूस महाराष्ट्राच्या पत्रकार विश्वातील खूप मोठा नाव आहे. पत्रकार किंवा माध्यम ह्यांच्या राजकारणाच्या वाढता प्रभाव लक्षात घेतला आता राजकीय पक्षांनी आणि विविध संघटनेनी त्यांचा मोठा वापर स्वतःच्या पक्षासाठी किंवा स्वतःच्या संघटनेसाठी तयार करायला सुरुवात केली आहे या राजकीय आणि माध्यमांच्या देवाण-घेवाणीमूळे माध्यमातील स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढली आणि माध्यमाची निकोपता अगदी रसातळाला गेली.

माध्यम हा लोकशाहीचा चौथा स्तंभ होता आणि आहे देखील. पण आज माध्यमांचा राजकारणावर आणि राजकारणावरचा माध्यमांवर अती प्रभाव झाल्याने दोघांतही साम्यस्थळे पाहायला मिळतात ती म्हणजे दोघेही अनेकवेळा सामान्य जनतेपासून दूर जातात. त्यामुळे मतदारांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. अपेक्षा सोडा आजही महत्त्वाच्या पायाभूत सुविधा पासून सामान्य माणसे खुपच दुर आहेत.

पर्वतीय क्षेत्रामध्ये आजही विज, रस्ते, आरोग्य, शिक्षण, पाणी हयावर अजून उपाय योजना झाला नाहीत, या बाबीनां माध्यमं राजकीय माणयांच्या पर्यत पोचवत नाहीत. राजकारणाला तिथं पर्यत पोचायला लक्ष नाही. किंबहुना तितकासा वेळ नाही माध्यमंच लक्ष असेल तर समाजाची उन्नती किंवा समाजाला योग्य तो न्याय मिळतो तशी अपेक्षा अंशत: काही अजून तेवढा विश्वास आहे.

माध्यमांची भूमिका सर्वसाधारणपणे सत्य किंवा जे आहे ते मतदारांपर्यंत पोहोचणे असीच मर्यादित असते असे नाही. त्यातला करुणपणा, सत्य आणि स्पष्ट भाव सामान्य मानवा पर्यंत पोहोचणे असावं. जी स्थिती आहे त्याला आपला पदराच घालने हा पत्रकारीतेचा किंवा माध्यमांचा धर्म नाही हे सर्वानी लक्षात घेतल पाहिजे. आज हयाही बाबतीत माध्यमं फारसी जागरूक नसतात, मीच कसा खरा आहे किंवा माझ्या माध्यम प्रमुखांचीच भूमिका कशी खरी आहे हयातच त्यांचा वेळ जातो. खर पाहता आज मध्यम “खरं ते माझं असंच वागायचं सोडून माझं तेच खरं” ह्या भूमिकेत असतात, ही माध्यमाची भूमिका कधीच योग्य नाही आणि ती भारताला परवडणारी देखील नाही हे हया अनुषंगाने सांगाव वाटत.

साधारणपणे 1998 ला प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी विश्वास दर्शक ठरावात आपले प्रधानमंत्री म्हणून शानदार भाषण झाले. हे भाषण जागतीक पातळीवर गाजले. अटल बिहारी वाजपेयी व त्यांच्या  पक्षांची लोकप्रियता तशी भारतीय जनमानसात नुकतीच रुजायला सुरुवात झाली होती. अटल वाजपेयी हयांच्या व कर्तुत्वाने आणि त्यांच्या विलोभणीय भाषाशैली ही सर्वप्रथम लोकसभा हया टीव्ही चॅनलच्या माध्यमातून संपूर्ण देशाला ऐकायला मिळाली. वाजपेयी यांनी हया माध्यमांचा वापर करून देशाचे शक्तिशाली नेते झाले. देशाच्या समोर संसदेतून माध्यमांच्या माध्यमातून भाजपा आणि वाजपेयी माणसांच्या मनात आणि घरात गेले व पुढे अनेक वर्ष ती जागा कायम राहिली.

अटल बिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी हया प्रधानमंत्री त्यांचा विचार करतांना सत्तांतरात देखील माध्यमांची भूमिका महत्वाची असते असं लक्षात घेता येते. माध्यमांची दाखल आता भारतात सर्वत्र घेतले जाते. सर्वसामान्य माणसांना एखादी खबर तरी अगोदर अन्य माध्यमातून पोचली तर तो समोरचा माणूस म्हणतो “टी.व्ही.वर तर नाही” म्हणजे माणसांचा माणसापेक्षा माध्यमांवर जास्त विश्वास वाढला आहे. पण माध्यमांची हया लोकप्रियतेमुळे किंवा त्यांच्या वाढत्या मागणीमुळे विश्वासर्हता खूपच घसरत चालली आहे हे ही नमूद करावासं वाटत.

माध्यम सत्तांतर करू शकतात असे माझे मत आहे. 2004 ते 2009 हया कालावधीत डॉ. मनमोहन सिंग सरकार मध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळे होते असा माध्यम आणि विरोधी पक्षांचा दावा होता. पण हया दोन्ही दाव्यांना फोल ठरवत सिंग सरकार 2009 मध्ये परत सत्तेत आले. तरीही 2009 ते 2014 त्या कालावधीत मागच्या तुलनेत भ्रष्टाचाराची प्रकरणे तुलनात्मकदृष्ट्या कमी होती. पण 2004 ते 2009 हया काळातला विरोधीपक्षांचा नेते लालकृष्ण अडवाणी हयांनी माध्यमांच्या माध्यमातून जसा तो प्रकार समाजासमोर आनने अपेक्षीत होता. तसा त्यांनी आणला नाही. 2009 ते 2014 च्या कालावधी तुलनात्मक दृष्ट्या तितकासा भ्रष्टाचार नसतांना हया काळातील विरोधी नेते विदयमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हयांनी भारतीय माध्यमांच्या माध्यमातून समान्य मानसापर्यंत पोचवला आणि देशात माध्यमांमुळे त्यांना मिळालेला माध्यमांच्या सकारात्मकतेमुळे हे मोठे सत्तांतर घडले आणि आज आपण सर्व पोहतोय.

आज भारतीय राजकारणात राज करण्याची कारण विसरून लोक काम करीत आहेत. आणि सोबतीला प्रसार माध्यमं फक्त प्रसार करण्या इतकीच मर्यादित राहली आहेत. कशाचा प्रसार करावा आणि कोणत्या विषयाच माध्यम बनाव हे प्रसार माध्यमं विसरली आहेत. तर राजकारणी कशाचही राजकारण करू पाहतात.

मागील वर्षी ज्या प्रकरणातून काहीही हाती लागणार नव्हतं हे माध्यमांनाही माहिती होतं राजकारणी मंडळीला हे माहिती होते तरी देखील शाहरुख खानचा मुलगा त्यांच्या भोवती एकोणतीस दिवस धुरळ उठला. प्रादेशीक आणि राष्ट्रीय प्रसार माध्यमं आणि राष्ट्रीय तसेच प्रादेशिक राजकारण हे हयाच भोवती फिरतांना दिसत होते. हया एकोणतीस दिवसात ना सामान्यांचा काही विषय घेता ना सामाजिक होता. ते अशा पद्धतीचे माध्यमांनी आणि राजकारणानी समाजाची गळचेपी केली होती.

**निष्कर्ष**

सध्या प्रसार माध्यमं आपण माध्यम आहोत हेच विसरले आहेत. ते माध्यम न बनता मध्य च्या भूमिकेत आहेत. ही त्यांची मध्यंची भूमिका ना समाजाला परवडनारी आहे. ना राजकारणाला परवडनारी आहे. माध्यम सर्वकाही परावर्तीत करु शकतात. माध्यमांची भूमिका आता प्रभावी आहे किंवा खूप प्रभावी झाली आहे. हे सांगायला आता कोणाचीच गरज नाही. त्यात सोशल मीडियाने त्यात अधिकची भर टाकलाने आणि मुक्तपणे व्यक्त होण्याच्या पद्धतीने हया विषयाला अधिक गती मिळाली आहे. त्यात आपल्याला अधिक चांगल करण्याचा प्रयत्न माध्यमांनी केलास माध्यमाची उंची समाजात अधिक वाढत राहिल. समाज आणि राजकारण किंवा मतदार आणि राजकीय मंडळी हयांचा आपण माध्यम आहोत अशी प्रामानीक भावना माध्यमांनी स्वतः मध्ये रुचवावी म्हणजे समता आणि माध्यम मोठी होत राहतील.

राजकारणाची घसरलेली पातळी आपण सर्वांनी विषेत: महाराष्ट्राने जी बघितली ती कोणीच बघितली नाही. हयात माध्यमांचीही गळचेपी झाली. अनेक माध्यम प्रमुखांनाही संबंधित सरकारने कारागृहात टाकले हयांचे प्रत्यक्षदर्शि आपणच आहोत. त्यांचा परिणाम असा झाला की ती राजकीय मंडळी त्या माध्यम प्रमुखावर विश्वात ठेवत नाही आणि तो माध्यम प्रमुख त्या पक्षप्रमुखांची कधी किंमत करत नाही हे आपण पाहिलय हयात काय झाल तर नेमकी सत्य भूमिका कोणीची हे सामान्य मतदारा प्रयत्न आले नाही किंवा येत नाही.

माध्यमे आणि राजकारण त्या दोन्ही संस्था परस्परपुरक आहेत. माध्यमांच्या सहकार्य शिवाय राजकारण चालत नाही आणि सहकार्याच्या प्रमाणिक भूमीके शिवाय समाजाला योग्य न्याय मिळणार नाही. आजची किंवा कधीच टोकाची हया दोन्ही संस्थांची भूमिका समाजाच्या हिताची नाही हे दोन्ही संस्थानी लक्षात घेतले किंवा आपला दोन्ही संस्था हया जनमाध्यम आहेत हया सोज्वळ सालस भूमिकेत जो पर्यंत एकमेव असनार नाही तोपर्यंत सामान्यांचे हीत जोपासला जाणार नाही...

संदर्भसूची

१. The Future of Social Media And its Impact

२. Role and Impact of Social Media And Society

३. Effects of Social Media on Society

४. Google

५. भारतीय लोकशाही आणि प्रसार माध्यमे

६. Wikipedia